वाचले :- १) मा. महापालिका सभा ठराव क्र. ५०२४ दि. १०/१०/२००३
२) कायदा सल्लागार पिं.चिं. मनपा यांचेकडील पत्र क्र काम/२/कावि/२२/२०१७
दि.६/१/२०१७ अन्वये दिलेला अभिप्राय
३) आदेश क्र. लेखा/३/कावि/१३३/२०२० दि. १८/०५/२०२०
४) भारत सरकार,वित्त विभागाचे पत्र क्र. १/४/२०२१- E.II(B)दि.२५/१०/२०२१
५) महासचिव, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ यांचे पत्र
दि.२५/१०/२०२१
६ ) मा.आयुक्त यांचे कडील दिनांक ८/ १० / २०१८ चा मान्य प्रस्ताव
७ ) मा.आयुक्त यांचे कडील दिनांक ३ / १९ / २०२१ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८. लेखा विभाग
क्र. लेखा/१अ/कावि/११५१/२०२१
दिनांक :- ३ /११ /२०२१

**विषय :- मनपा कर्मचा-यांना दिनांक १ जुलै २०२१ पासून सुधारीत दराने महागाई भत्ता मंजूर करण्याबाबत...**

**आदेश,**

केंद्रशासनाचे वित्त विभागाकडील ज्ञापन क्रमांक १/४/२०२१ E.II(B) दि.२५/१०/२०२१ अन्वये केंद्र सरकारने केंद्रीय कर्मचा-यांना दिनांक १ जुलै २०२१ पासून २८ टक्के वरुन ३१ टक्के प्रमाणे महागाई भत्ता वाढ मंजूर केलेली आहे. महापालिका कर्मचा-यांना केंद्रीय कर्मचा-यांप्रमाणे महागाई भत्ता लागू करण्याचे धोरण उपरोक्त वाचले क्र. १ अन्वये ठरलेले असल्याने पिंपरी चिंचवड मनपा कर्मचा-यांना दिनांक १ जुलै २०२१ पासून महागाई भत्ता वाढ मंजुर करणे आवश्यक आहे. मा.आयुक्त यांनी दिनांक ०८/१०/२०१८ च्या मान्य प्रस्तावान्वये म.न.पा.नियमित कर्मचा-यांबरोबर सेवानिवृत्त कर्मचारी यांना सुध्दा महागाई भत्ता वाढ मंजुर करणे बाबत मान्यता दिली आहे.

सबब, उपरोक्त वाचले क्रमांक १ ते ६ च्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड मनपा कर्मचा-यांना तसेच सेवानिवृत्त कर्मचारी व कुटुंब निवृत्तीवेतन धारक यांना सुध्दा केंद्रशासकीय कर्मचा-यांप्रमाणे दिनांक १ जुलै २०२१ पासून सातवा वेतन आयोगानुसार अनुज्ञेय महागाई भत्ता २८ टक्के ऐवजी ३१ टक्के प्रमाणे लागू करण्यात येत आहे. माहे नोव्हेंबर २०२१ चे वेतन व पेन्शन बिल ३१ टक्के महागाई भत्ता विचारात घेऊन काढण्यात यावे. माहे जुलै २०२१ ते माहे ऑक्टोंबर २०२१ अखेरची महागाई भत्त्याची थकबाकी माहे नोव्हेंबर २०२१ चे वेतन देयके / पेन्शन देयका बरोबर काढण्यात यावी.

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

प्रति,

सर्व संबंधित शाखाप्रमुख

प्रत :-

१) मा.आयुक्त कक्ष २) मा. अति आयुक्त कक्ष

३) मा.मुख्यलेखापरिक्षक कार्यालय ४) मा. कामगार कल्याण अधिकारी

५) मा. मुख्य माहीती व तंत्रज्ञान अधिकारी ६) मा.उप. आयुक्त , प्रशासन

२/- वरील आदेशानुसार पगार बिलांमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

२/- माहिती साठी सादर

(जितेंद्र कोळंबे)
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८